मराठी
# न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# भाजपा युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांचा राजीनामा!


## पक्षश्रेष्ठींच्या निर्णयाकडे लक्ष: बुथ अध्यक्ष ते भाजयुमो प्रदेशाध्यक्ष हा प्रवास एका आरोपाने संपला?

**पिंपरी | प्रतिनीधी**

भारतीय जनता युवा मोर्चाचे (भाजयुमो) महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अनुप अविनाश मोरे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी राजीनाम्याचे पत्र भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना सुपूर्द केले आहे.

भाजपच्या महिला पदाधिकाऱ्याला भारतीय जनता युवा मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षाच्या नावाने टोळक्याने जिवे मारण्याची धमकी दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला होता. ही घटना चिंचवड येथे घडली होती. याप्रकरणी भाजयुमोचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांच्यासह इतर सात जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या सर्व प्रकारामुळे सर्व स्तरातून भारतीय जनता पक्षावर टीकेची झोड उठली होती. त्याच पार्श्वभूमीवर आज अनुप मोरे यांनी त्यांच्या प्रदेशाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला आहे.



अनुप अविनाश मोरे
प्रदेश अध्यक्ष
भारतीय जनता युवा मोर्चा, महाराष्ट्र प्रदेश

दिनांक ३०/१०/२०२५

प्रति,
मा.श्री.रविंद्रजी चव्हाण साहेब,
अध्यक्ष – भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश.

विषय – भारतीय जनता युवा मोर्चा,महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष पदाचा राजीनामा देणेबाबत......

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की,गेले काही दिवसांपासून माझ्यावर खोटे आरोप केले जातात.माझी नाहक बदनामी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. माझ्यामुळे आपल्या पार्टीची प्रतिमा मलीन होऊ शकते.

माझे आई ,वडील माझे कुटुंब आणि मी गेली ४० वर्षांपासून भारतीय जनता पार्टीचे काम प्रामाणिकपणे अविरत करत आहे.बुथ अध्यक्ष ते भारतीय जनता युवा मोर्चा प्रदेश अध्यक्ष पर्यंत पोहोचण्यासाठी पार्टीने माझ्यावर विश्वास टाकला. आमचा परिवार आणि मी सदैव भारतीय जनता पार्टीसोबत आहे आणि असेन.भारतीय जनता पार्टीची माझ्यामुळे प्रतिमा मलीन होऊ नये म्हणून मी सदैव मुख्यमंत्री आदरणीय श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब,भाजपा प्रदेश अध्यक्ष मा.श्री.रविंद्रजी चव्हाण साहेब तसेच पार्टीतील नेते,पदाधिकारी,कार्यकर्ते,सहकारी यांच्या माझ्यावरील विश्वासामुळे मी माझ्या भारतीय जनता युवा मोर्चा ,महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष पदाचा राजीनामा देत आहे.येत्या काळामध्ये प्रथम राष्ट्र ,नंतर पार्टी ,नंतर स्वतः या तत्वावर सदैव निष्ठेने काम करेन.तरी आपण माझ्या राजीनाम्याचा स्वीकार करावा हि नम्र विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,
अनुप शैलजा अविनाश मोरे
भारतीय जनता युवा मोर्चा ,महाराष्ट्र प्रदेश

संपर्क कार्यालय : प्लॉट नं. १, शॉप नं. १, साई भुषण बेकरी शेजारी, संभाजी चौक, प्राधिकरण, पुणे – ४१
निवास : शैल निवास, प्लॉट नं. ३८०, सेक्टर नं. २८, प्राधिकरण, निगडी, पुणे – ४११ ०४४.

राजीनामा पत्रात अनुप मोरे यांनी म्हटले आहे की, “गेल्या काही दिवसांपासून माझ्यावर खोटे आरोप केले जात आहेत. माझी नाहक बदनामी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. माझ्यामुळे आपल्या पार्टीची प्रतिमा मलीन होऊ शकते.”

मोरे यांनी पुढे नमूद केले आहे की, “माझे आई-वडील, माझे कुटुंब आणि मी गेली ४० वर्षांपासून भारतीय जनता पक्षाचे काम प्रामाणिकपणे आणि अविरत करत आहोत. बुथ अध्यक्ष ते भाजयुमो प्रदेशाध्यक्ष या प्रवासात पक्षाने माझ्यावर विश्वास टाकला. आमचा परिवार आणि मी सदैव भारतीय जनता पक्षासोबत आहे आणि राहू.”

“भारतीय जनता पक्षाची माझ्यामुळे प्रतिमा मलीन होऊ नये म्हणून मी हा निर्णय घेत आहे. मी सदैव ‘प्रथम राष्ट्र, नंतर पार्टी, नंतर स्वतः’ या तत्वावर निष्ठेने कार्य करत राहीन,” असे त्यांनी पत्रात स्पष्ट केले आहे. दरम्यान त्यांच्या या अचानक राजीनाम्यामुळे युवा मोर्चा संघटनेत मोठी उलथापालथ निर्माण होऊ शकते. त्यामुळे पक्षश्रेष्ठी काय निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> “ कायदा आणि सुव्यवस्थेचे प्रणेते माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांच्या नेतृत्वाखाली हे सरकार मार्गक्रमण करीत आहे. तसेच भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पक्ष आणखी मजबूत होत आहे. पक्षातील वरिष्ठ नेतेमंडळी देखील यात मागे नाहीत. केवळ माझ्यामुळे पक्षहित आणि पक्षश्रेष्ठींच्या कार्यात बाधा नको, याकरिता परिस्थितीचा सारासार विचार करून मी हा निर्णय माझ्या सद्सद् विवेकबुध्दिने घेतलेला आहे. यात कोणाचाही हस्तक्षेप नाही. दरम्यान भाजपा युवा मोर्चाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि माध्यम प्रतिनिधी यांचे आजपर्यंतच्या सहकार्याबद्दल मी आभार मानतो. धन्यवाद..!
>
> - अनुप मोरे

# महापालिकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारांना निवडणूक खर्चाची मर्यादा 13 लाख रुपयांपर्यंत निश्चित!

## राज्य निवडणूक आयोगाकडून आदेश जारी : जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात होणार मतदान?

**पिंपरी | प्रतिनीधी**

राज्य निवडणूक आयोगाने आगामी नियोजित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता उमेदवाराने करावयाच्या निवडणूक खर्चाची मर्यादा निश्चित केली आहे. याबाबतचा आदेश राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आला आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महापालिकेचा समावेश ‘ब’ वर्ग महापालिकेत असून, या महापालिकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारांना निवडणूक खर्चाची मर्यादा १३ लाख रुपयांपर्यंत निश्चित करण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशात महानगरपालिका सदस्य, नगरपरिषद / नगरपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच ग्रामपंचायत निवडणुकांकरिता उमेदवाराने करावयाच्या निवडणूक खर्चाची मर्यादा निश्चित केली आहे. यामध्ये बृहन्मुंबई महापालिका आणि ‘अ’ वर्गामध्ये येणाऱ्या पुणे व नागपूर महापालिकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारांना निवडणूक खर्चाची मर्यादा १५ लाख रुपयांपर्यंत निश्चित करण्यात आली आहे. तर ‘ब’ वर्गामध्ये येणाऱ्या पिंपरी चिंचवड, नाशिक व ठाणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारांना निवडणूक खर्चाची मर्यादा १३ लाख रुपयांपर्यंत निश्चित करण्यात आली आहे.




याशिवाय ‘क’ वर्गामध्ये येणाऱ्या कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, छत्रपती संभाजीनगर व वसई-विरार महापालिकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारांना निवडणूक खर्चाची मर्यादा ११ लाख रुपयांपर्यंत निश्चित करण्यात आली असून, ‘ड’ वर्गामध्ये येणाऱ्या उर्वरित १९ महापालिकांच्या निवडणुकीसाठी उमेदवारांना निवडणूक खर्चाची मर्यादा ९ लाख रुपयांपर्यंत निश्चित करण्यात आली आहे.

उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा हिशोब वेळोवेळी सादर करणे बंधनकारक राहील, असेही राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

# मेट्रो स्टेशनच्या 500 मीटर परिसराचा स्वतंत्र विकास

## पिंपरी-चिंचवडमधील 11 मेट्रो स्टेशन परिसरासाठी लोकल एरिया प्लान; पुनर्निर्माणाला प्राधान्य

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात पिंपरी ते दापोडी मेट्रो धावत आहे. पिंपरी ते निगडीच्या भक्ती-शक्ती समूह शिल्प चौकापर्यंत मेट्रो मार्गिकेचे काम सुरू आहे. तर, पीएमआरडीच्या हिंजवडी ते शिवाजीनगर मार्गात वाकड हे स्टेशन महापालिका हद्दीत येते. या अकरा मेट्रो स्टेशनपासून 500 मीटर परिसराचा महापालिका स्वतंत्रपणे विकास करणार आहे. त्यासाठी महापालिका स्वतंत्रपणे लोकल एरिया प्लान (एलएपी) तयार करीत आहे. त्याद्वारे त्या भागांतील निवासी, व्यावसायिक इमारत तसेच, इमारत पुनर्निर्माणासाठी बांधकाम परवानगीत बदल केला जाणार आहे. तेथील वाहतूक व्यवस्था, पार्किंग आदी सेवा-सुविधांना प्राधान्य दिले जाणार आहे.



शहरात मेट्रो मार्गिकेचे काम सन 2016 पासून सुरू झाले. मेट्रो 6 मार्च 2022 पासून धावत आहे. शहरातील पिंपरी, संत तुकारामनगर, नाशिक फाटा, कासारवाडी, फुगेवाडी व दापोडी हे मेट्रो सहा स्टेशन सुरू आहेत. तसेच, पिंपरी ते निगडी या विस्तारीत मार्गावर चिंचवड स्टेशन, आकुर्डी, टिळक चौक व भक्ती-शक्ती समुह शिल्प चौक असे चार स्टेशन उभारण्यात येणार आहेत. पीएमआरडीच्या हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गात वाकड स्टेशन आहे. तो भाग महापालिका हद्दीत येतो. या अशा एकूण 11 मेट्रो स्टेशन परिसराचा महापालिका विकास करणार आहे. स्टेशनपासून 500 मीटर परिघातील भागास ट्रान्झिट ओरिएंटेड डेव्हलपमेंट झोन (टीडीओ झोन) म्हणतात.

शासनाच्या युडीसीपीआरच्या नव्या नियमावलीनुसार टीडीओ झोनचा एलएपी आराखडा महापालिका करणार आहे. त्यानुसार त्या भागांचा विकास केला जाणार आहे. आराखडा बनविण्याचे काम गुजरातच्या एचसीपी डिझाईन, प्लानिंग अँण्ड मॅनेजमेंट प्रा. लि. या एजन्सीला देण्यात आले आहे. या एजन्सीने पवना, मुळा व इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाचा आराखडा तयार केला आहे. तसेच, महापालिकेच्या सुधारित विकास योजना आराखडा (डीपी प्लान) याच एजन्सीने तयार केला आहे. एलएपीसाठी महापालिका त्या एजन्सीला प्रत्येक हेक्टरसाठी 19 हजार 950 रूपये शुल्क देणार आहे.

ती एजन्सी 11 मेट्रो स्टेशनच्या भागांचा सर्व्हे करणार आहे. वाहतूक कोंडी होऊ नये, ये-जा करणे सुलभ व सुरक्षित असेल. त्यासाठी नवीन आरक्षणे टाकण्यात येणार आहेत. नागरिकांचे राहणीमान उंचावेल, असा आराखडा तयार केला जाणार आहे. टीडीओ झोनमध्ये नव्याने उभारण्यात येणाऱ्या इमारतींसाठी पालिकेची विशेष बांधकाम परवानगी घ्यावी लागणार आहे. तसेच, इमारतीसमोर 9 मीटर जागा पार्किंगसाठी सोडावी लागणार आहे. आराखडा तयार करण्यासाठी 9 महिन्यांची मुदत आहे. त्यावर सुनावणी पूर्ण झाल्यानंतर तो राज्य शासनाकडे मंजुरीसाठी पाठविला जाईल. अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर पालिकेकडून प्रत्यक्ष अंमलबजावणी केली जाणार आहे. त्यासाठी दीड वर्षाची प्रतिक्षा करावी लागणार आहे.

### अकरा मेट्रो स्टेशन परिसराचा होणार विकास

**» पिंपरी, संत तुकारामनगर, नाशिक फाटा, कासारवाडी, फुगेवाडी व दापोडी हे मेट्रो सहा स्टेशनवरून मेट्रो धावत आहे. पिंपरी ते निगडी या विस्तारीत मेट्रो मार्गावर चिंचवड स्टेशन, आकुर्डी, टिळक चौक व भक्ती-शक्ती समुह शिल्प चौक असे चार स्टेशन असणार आहेत. पीएमआरडीच्या हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गात वाकड स्टेशन आहे. असे एकूण 11 मेट्रो स्टेशन परिसराचा विकास होणार आहे.**


# महापालिकेचा सात महिन्यांत 624 कोटी 85 लाख रुपयांचा मालमत्ता कर वसूल

## सध्या एकूण 7 लाख 40 हजार मालमत्तांची नोंद; 4 लाख 78 हजार मालमत्ताधारकांनी भरला कर

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये उल्लेखनीय कामगिरी करत पहिल्या सात महिन्यांतच तब्बल ६२४ कोटी ८५ लाख रुपयांचा मालमत्ता कर वसूल केला आहे. चालू आर्थिक वर्षात नागरिकांचा वाढता प्रतिसाद, विभागाचे नियोजनबद्ध कामकाज आणि विविध सवलतींचा लाभ या सर्व घटकांमुळे कर संकलनात विक्रमी वाढ झाली आहे. शहरात सध्या एकूण ७ लाख ४० हजार मालमत्तांची नोंद असून, त्यापैकी ४ लाख ७८ हजार मालमत्ताधारकांनी आतापर्यंत कर भरणा केला आहे. ज्या मालमत्ताधारकांनी अद्याप मालमत्ता कर भरला नाही, त्यांनी तो लवकरात लवकर भरावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.






आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या तुलनेत यंदा ऑक्टोबर महिन्यात कर वसुलीचा आकडा मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये १ एप्रिल २०२४ ते ३१ ऑक्टोबर २०२४ या काळात ५४२ कोटी ६० लाख रुपये इतका मालमत्ता कर वसूल झाला होता. त्याच्या तुलनेत चालू आर्थिक वर्षात पहिल्या सात महिन्यांत म्हणजेच १ एप्रिल २०२५ ते ३० ऑक्टोबर २०२५ या कालावधीत ६२४ कोटी ८५ लाख रुपये म्हणजेच तब्बल ८२ कोटी २५ लाख रुपयांचा मालमत्ता कर अधिक वसूल झाला आहे.

पहिल्या व दुसऱ्या तिमाहीत नागरिकांनी कर भरण्यास प्रोत्साहन मिळावे म्हणून विभागाने विविध सवलती जाहीर करण्यासोबतच मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यावर भर दिला होता. त्याला नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. अनेक करदात्यांनी ऑनलाईन पर्यायांचा वापर करून घरबसल्या कराचा भरणा केला, तर काहींनी महापालिकेच्या काऊंटरवर थेट कराचा भरणा केला.

**ऑनलाईन कर भरण्यास प्राधान्य..**

पिंपरी चिंचवड शहरातील नागरिक ऑनलाईन माध्यमातून मालमत्ता कर भरण्यास प्राधान्य देत आहेत. चालू आर्थिक वर्षात १ एप्रिल २०२५ ते ३० ऑक्टोबर २०२५ पर्यंत ४ लाख ७८ हजार मालमत्ताधारकांनी कराचा भरणा केला असून, त्यापैकी ३ लाख ९१ हजार मालमत्ताधारकांनी ऑनलाईन कर भरला आहे. ऑनलाईन कर भरण्यात आलेली रक्कम ही ४९६ कोटी रुपये आहे.

“ पिंपरी चिंचवडकरांनी मालमत्ता कर भरण्यासाठी दाखवलेला उत्साह ही शहराच्या प्रगतीची खरी ओळख आहे. नागरिकांनी वेळेवर कर भरून महापालिकेच्या विकासकामांना बळ दिले आहे. ही फक्त वसुलीची आकडेवारी नाही, तर शहराच्या जबाबदार नागरिकत्वाची खूण आहे. प्रशासन आणि नागरिकांच्या या संयुक्त प्रयत्नांमुळे पिंपरी चिंचवड शहर नक्कीच विकासाच्या नवीन उंची गाठेल.

**– प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

“ कर संकलन व कर आकारणी विभागाच्या नियोजनबद्ध कामकाज, डिजिटल सुविधा आणि जनजागृती मोहिमेमुळे कर संकलनात लक्षणीय वाढ झाली आहे. नागरिकांना घरबसल्या कर भरण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली असून, याचा मोठ्या प्रमाणात उपयोग करण्यात आला आहे. पुढील काळात ही गती कायम ठेवत करदात्यांना अधिक सुलभ सेवा देण्याचा आमचा प्रयत्न राहील.

**– पंकज पाटील, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

# 'पुणे महानगर प्रदेश ग्रोथ हब' आराखडा तयार करावा : बी. व्ही. आर. सुब्रमण्यम

## 'पुणे महानगर प्रदेश ग्रोथ हब'च्या माध्यमातून तयार होणारा आर्थिक विकास आराखडा महत्त्वपूर्ण ठरणार आहे

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर क्षेत्रात आर्थिक विकासाची प्रचंड क्षमता असून 'पुणे महानगर प्रदेश ग्रोथ हब'च्या माध्यमातून तयार होणारा आर्थिक विकास आराखडा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. त्यासाठी प्रारूप आर्थिक बृहत् आराखडा लवकरात लवकर तयार करून सादर करावा, अशा सूचना नीति आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. व्ही. आर. सुब्रमण्यम यांनी दिल्या.

'पुणे महानगर ग्रोथ हब' बाबत विधानभवन येथे (दि. २९) आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी राज्य वित्त आयोगाचे अध्यक्ष डॉ. नितीन करीर, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे मनपा आयुक्त नवल किशोर राम, कृषी आयुक्त सूरज मांढरे, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. योगेश म्हसे, अतिरिक्त आयुक्त दीपक सिंगला, पुणे मनपा अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी पी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सतीश खडके, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, केपीआयटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी रवी पंडित आदी उपस्थित होते. आयएसईजीचे संचालक तथा मॅकेन्झी अँड कंपनीचे सहयोगी शिरीष संखे दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.



### विकास कामांची नोंद

» महानगर आयुक्त डॉ. म्हसे यांनी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी प्राधिकरणाच्या क्षेत्राची व्याप्ती, विविध विकास केंद्रांच्या आर्थिक उद्योग व त्याला चालना देण्याच्या दृष्टीने प्राधिकरणाने हाती घेतलेले रिंगरोड, रस्ते, मूळ पायाभूत सुविधा, नदी प्रदूषण रोखणे, नगर रचना योजना, सांडपाणी व्यवस्था, परवडणारी घरे आदींच्या अनुषंगाने सादरीकरण केले. त्याअनुषंगाने पुणे आंतरराष्ट्रीय संस्थेने या विकास कामांची नोंद घेऊन पुढील आर्थिक वाढीच्या नियोजन करण्याबाबत सूचित केले.

बी. व्ही. आर. सुब्रमण्यम यांनी नीति आयोगाने यापूर्वी देशभरातील पहिल्या टप्प्यातील ४ शहर – मुंबई महानगर, सुरत, वाराणसी, विशाखापट्टणम या शहरांसाठी तयार केलेल्या आर्थिक आराखड्यातील प्रमुख बाबींच्या अनुषंगाने सादरीकरण केले. ते यावेळी म्हणाले, पुणे हे पूर्वीपासूनच वाहन उद्योग, माहिती तंत्रज्ञान उद्योग तसेच औद्योगिक उत्पादन क्षेत्रात अग्रेसर असल्याने या परिसरात आर्थिक विकासाला मोठा वाव आहे. त्यामुळेच या शहराची 'ग्रोथ हब' साठी निवड केली आहे. या ठिकाणी योग्य नियोजन केल्यास आर्थिक विकास आणि सकल उत्पादनात वाढ करणे व त्या माध्यमातून रोजगार संधी निर्माण करणे खऱ्या अर्थाने शक्य आहे. त्यासाठी येथील संसाधने, विविध क्षेत्रातील सर्व विभागांची माहिती व आर्थिक नियोजना विषयी माहिती घ्यावी आदी सूचना त्यांनी दिल्या.

डॉ. करीर यांनी यावेळी विविध सूचना केल्या. मुंबई महानगर आणि पुणे महानगर ग्रोथ हबमुळे राज्याच्या आर्थिक विकासात मोठी भर पडणार असल्याचे ते म्हणाले. पुणे ग्रोथ हबच्या अनुषंगाने विविध विभागांशी समन्वय साधण्याचे काम करण्यात येत असून लवकरात लवकर आराखडा त्यात करण्यात येईल असे विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार यांनी सांगितले.

### नोकऱ्या निर्माण करण्याचे ध्येय

» आर्थिक आराखडा तयार करण्याच्या प्रक्रियेबाबत आयएसईजी व मॅकेन्झी अँड कंपनीच्यावतीने शिरीष संखे यांनी सविस्तर माहिती दिली. सदर या उपक्रमांतर्गत भारतातील ८-१० महानगर क्षेत्रांच्या विविध क्षेत्रातील विकासासह सकल देशांतर्गत उत्पादनात (जीडीपी) मध्ये वाढ करणे व रोजगाराकरिता मोठ्या प्रमाणात नोकऱ्या निर्माण करण्याचे ध्येय निश्चित केलेले आहे. आता पुढील टप्प्यात पुणे महानगर क्षेत्रासाठी आर्थिक आराखडा तयार करायचा असल्याने पुणे शहराविषयी सर्व माहितीचे सादरीकरण यावेळी करण्यात आले.


# राजाराम पूल ते शिवणे नदीकाठाचा कायापालट करण्यासाठी 450 कोटींचा आराखडा !

## महापालिकेने 450 कोटी रुपयांचा आराखडा तयार केला असून, लवकरच या कामाची निविदा काढण्यात येणार आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

नदीकाठ सुधारणा प्रकल्पांतर्गत राजाराम पूल ते वारजे-शिवणे पुलापर्यंत मुठा नदीचा सुमारे ८.२ किलोमीटर परिसर सुशोभित केला जाणार आहे. या मार्गातील एकतानगरी परिसरात पुराचे पाणी जाऊ नये, यासाठी संरक्षित भिंत बांधली जाणार आहे. त्यासाठी महापालिकेने ४५० कोटी रुपयांचा आराखडा तयार केला असून, लवकरच या कामाची निविदा काढण्यात येणार आहे.

महापालिकेने नदीकाठसुधार योजनेचे काम हाती घेतले आहे. योजनेच्या पहिल्या टप्प्यात संगम पूल ते बंडगार्डन आणि बंडगार्डन ते कल्याणीनगर दरम्यान भागाचे काम सुरू करण्यात आले आहे. तसेच रामनदी परिसरातील निविदाही काढण्यात आल्या आहेत. आता राजाराम पूल ते वारजे-शिवणे नदीकाठाचा परिसर सुशोभित केला जाणार आहे. त्यासाठी ४५० कोटी रुपयांचा खर्चाचा अंदाज असल्याचे प्रकल्प विभागाचे अधीक्षक अभियंता दिनकर गोजारे यांनी सांगितले.



पावसाळ्यात मुठा नदीला येणाऱ्या पुरामुळे दर वर्षी सिंहगड रस्त्यावरील एकतानगरी परिसरातील लोकवस्तीत पाणी शिरते. येथील इमारतींच्या पहिल्या मजल्यापर्यंत पुराचे पाणी जात असल्याने पावसाळ्यात रहिवासी आणि प्रशासनाची तारांबळ उडते. येथील पुराची समस्या सोडविण्यासाठी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी नदीकाठसुधार योजनेच्या कामाला प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला असल्याचे दिनकर गोजारे यांनी स्पष्ट केले.

राजाराम पूल ते हिंगणे दरम्यान नदीकाठी असलेल्या इमारतींमध्ये पुराचे पाणी शिरते. विठ्ठलवाडीजवळील नाला नदीला मिळत असल्याने पुराचा धोका वाढतो. या पार्श्वभूमीवर सीमाभिंत बांधण्यात येणार आहे.

### शंभर वर्षांतील पुराचा अभ्यास करून सुधारणा

» शंभर वर्षांतील पुराचा अभ्यास करून येथील नदीकाठ सुधारणा केली जाणार आहे. यामुळे नदीची वहनक्षमता वाढणार आहे. नदीच्या दोन्ही बाजूंना मिळून चार घाट आहेत. या घाटांचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे. अधिक जागा उपलब्ध झाल्यास १२ मीटर रुंदीचे पादचारी आणि सायकल मार्गदेखील विकसित केले जाणार आहे. एकतानगरी परिसरात केल्या जाणाऱ्या कामांमुळे खर्चात १५० कोटी रुपये वाढ झाली आहे. आता खर्च सुमारे ४५० कोटी रुपये होण्याचा अंदाज आहे. लवकरच या कामाची निविदा काढण्यात येणार असल्याचे गोजारे यांनी नमूद केले. या प्रकल्पात एकतानगरी येथे संरक्षित भिंत, चार घाटांचे सुशोभीकरण, पादचारी आणि सायकल मार्ग तयार केले जाणार आहेत.

# शरद पवार गटाला खेडमध्ये मोठा धक्का!

## अतुल देशमुख शिंदे गटाच्या वाटेवर ; राजकीय समीकरणं बदलणार

**पुणे | प्रतिनिधी**

अतुल देशमुख यांनी 'तुतारी' सोडून 'धनुष्यबाण' हाती घेण्याची तयारी केल्यानंतर खेड तालुक्यातील राजकारणात नवीन गणित मांडले जाणार का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. त्यांच्या या निर्णयाचा परिणाम तालुक्यातील राष्ट्रवादी संघटनेवर आणि आगामी निवडणुकांच्या समीकरणांवर कितपत होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. खेड तालुक्यातील राजकारणात पुन्हा एकदा उलथापालथ होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

स्थानिक पातळीवर प्रभावी मानले जाणारे अतुल देशमुख यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) सोडण्याचा निर्णय घेतला असून, ते लवकरच शिवसेना (एकनाथ शिंदे गट) मध्ये अधिकृतरित्या प्रवेश करणार असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे तालुक्यातील राजकीय समीकरणे नव्याने बदलण्याची शक्यता आहे. अतुल देशमुख यांनी गेल्या दशकात भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून राजकारणात सक्रिय प्रवेश केला होता.




### स्थानिक राजकारणात नवे समीकरण..

» देशमुख यांच्या हालचालींमुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या तालुका संघटनेला धक्का बसू शकतो. तर दुसरीकडे, शिंदे गटाने स्थानिक स्वराज्य निवडणुकांसाठी नव्या चेहऱ्यांच्या तयारीला वेग दिला आहे. देशमुख हे कार्यकर्त्यांमध्ये लोकप्रिय असून, ग्रामपातळीवरील त्यांचे मजबूत नेटवर्क शिवसेनेला तळागाळात बळकट करू शकते. देशमुख यांच्या या नव्या राजकीय वळणानंतर खेड तालुक्यातील राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा प्रवेश 'गेमचेंजर' ठरू शकतो, असे मत राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत.

देशमुख यांच्या हालचालींमुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या तालुका संघटनेला धक्का बसू शकतो. तर दुसरीकडे, शिंदे गटाने स्थानिक स्वराज्य निवडणुकांसाठी नव्या चेहऱ्यांच्या तयारीला वेग दिला आहे. देशमुख हे कार्यकर्त्यांमध्ये लोकप्रिय असून, ग्रामपातळीवरील त्यांचे मजबूत नेटवर्क शिवसेनेला तळागाळात बळकट करू शकते. देशमुख यांच्या या नव्या राजकीय वळणानंतर खेड तालुक्यातील राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा प्रवेश 'गेमचेंजर' ठरू शकतो, असे मत राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत.

मात्र विधानसभेच्या निवडणुकीच्या अगोदर भाजप सोडून त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) मध्ये प्रवेश केला. खेड मतदारसंघातील जागा आघाडीतील वाटपात उद्धव ठाकरे गटाच्या शिवसेनेला मिळाल्याने त्यांना उमेदवारी मिळू शकली नाही. तरीही, त्यांनी आमदार बाबाजी काळे यांच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली होती. पण नंतर पक्षातील अंतर्गत गटबाजी आणि वरिष्ठांकडून झालेल्या दुर्लक्षामुळे त्यांनी तुतारीचा झेंडा खाली ठेवण्याचा निर्णय घेतल्याची चर्चा रंगली आहे.

### 'धनुष्यबाण'कडे झुकलेले मनोबल..

» शिवसेना (शिंदे गट) खेड तालुक्यात नव्याने संघटन उभे करण्यासाठी प्रयत्नशील असून, अतुल देशमुख यांच्या प्रवेशामुळे पक्षाला मोठा बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. देशमुख यांच्या प्रवेश सोहळ्याची तयारी अंतिम टप्प्यात असून, पुढील आठवड्यात खेड शहरात भव्य मेळावा होणार असल्याचे समजते.

### जुन्नरच्या शिडीचा वापर..

» दरम्यान, देशमुख यांच्या शिंदे गट प्रवेशासाठी जुन्नर तालुक्यातील 'शिडी'चा वापर झाल्याची चर्चा दबक्या आवाजात सुरू आहे. तथापि, सुरुवातीपासून शिंदे गटाशी निष्ठा ठेवणाऱ्या काही पदाधिकाऱ्यांमध्ये यामुळे नाराजी असल्याचे संकेत मिळत आहेत. आगामी काळात या घडामोडींमुळे खेड तालुक्याचे राजकीय चित्र किती आणि कसे बदलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# बावडा-लुमेवाडी गटात चुरस रंगणार; लक्षवेधी लढतीत प्रतिष्ठित नेत्यांची प्रतिष्ठा पणाला

## जिल्ह्यातील सर्वाधिक लक्षवेधी लढत या जिल्हा परिषदेच्या गटात होणार आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

यंदा पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद सर्वसाधारण असल्यामुळे, जिल्ह्यातील प्रत्येक जिल्हा परिषदेच्या मतदारसंघाला अनन्यसाधारण महत्व निर्माण झाले आहे. सर्वच नेत्यांचे वर्चस्व असलेल्या बावडा-लुमेवाडी या जिल्हा परिषद गटाची व पंचायत समितीची लढत ही दुरंगी नव्हे तर तिरंगी होण्याची चिन्हे आहेत. जिल्ह्यातील सर्वाधिक लक्षवेधी लढत या जिल्हा परिषदेच्या गटात होणार आहे.





यापूर्वी बावडा – लाखेवाडी असा हा गट होता. नव्याने या गटाचे नामकरण बावडा-लुमेवाडी झाले आहे. तसेच या गटातील काही जुनी गावे, दुसऱ्या गटाला जोडली आहेत. यामध्ये माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांना अधिकचे लीड देणारी गावे भांडगाव, शेटफळहवेली, भोडणी व लाखेवाडी ही गावे इतर गटात गेले असल्याने, त्याचा फटका निश्चितपणे हर्षवर्धन पाटील यांना बसेल असे बोलले जात आहे.

बावडा हे गाव स्वातंत्र्य मिळाल्यापासून राजकीय चर्चेत असणारे ठरले आहे. कर्मयोगी माजी खासदार दिवंगत नेते शंकरराव पाटील यांचे हे गाव असल्यामुळे सलग सहा वेळा आमदार दोनदा खासदार असल्यामुळे व त्यांच्यानंतर माजी मंत्री हर्षवर्धन पाटील हे तब्बल चार वेळा आमदार राहिल्यामुळे, इंदापूर तालुक्याच्या राजकारणाचा केंद्रबिंदू असणारे बावडा गाव व हा जिल्हा परिषद गट ठरलेला आहे.

माजी मंत्री हर्षवर्धन पाटील 1992 साली याच गटातून जिल्हा परिषदेचे सदस्य झाले. नंतर 1995 साली आमदार झाले. आत्तापर्यंतच्या सर्व जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये पाटील कुटुंबीयांच्या विचाराचा सदस्य निवडून आलेला आहे.

### एकाच गटात प्रभावशाली नेते

» जिल्हा बँकेचे संचालक आप्पासाहेब जगदाळे हे प्रभावशाली अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे नेते आहेत. तर भारतीय जनता पार्टीत जिल्हा कोर कमिटीचे सदस्य मयूरसिंह पाटील, तर राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष हनुमंत कोकाटे याच जिल्हा परिषद गटात येतात. विधानसभेतील अपक्ष उमेदवार प्रवीण माने यांचे प्रचारप्रमुख म्हणून मयूरसिंह पाटील यांनी चोख काम केल्यामुळे, याच गटातून सहा हजार मते प्रवीण माने यांना देण्यामध्ये मयूरसिंह पाटील यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या पत्नी निवडणूक लढवण्याची दाट शक्यता आहे.